# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# पिंपरी, पुणे १८
# आयातकर कार्यालय

## निविदा नोटीस क्रमांक. १/२०१०-२०११

## निविदा फॉर्म

किंमत रक्कम रूपये..१०००/-

**जकात विभागाचे भरारी पथकासाठी पेट्रोलवर चालणारी मारुती व्हॅन वाहने २४ तास सतत वापरासाठी भाडे तत्वावर करारपध्दतीने घेणेबाबत.**

d\salunkhe\Ghadge\13Tender Vehical\LP(27)

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

## आयातकर कार्यालय

## ई टेंडरींग निविदा सुचना क्रमांक १ - २०१०-२०११

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जकात विभागाकडील भरारी पथकाच्या वापरासाठी पेट्रोल मारूती व्हॅन या प्रकारची वाहने पुरविण्यासाठी इच्छुक पुरवठाधारकांकडून **ई-टेंडरींग कार्यप्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र. | कामाचा तपशिल | अंदाजे किमंत | अनामत र.रू. | बयाणा र.रू. | फॉर्म फी र.रू. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | भरारी पथकासाठी - पेट्रोल वर चालणारी ०४ मारुती व्हॅन वाहने भाडेतत्वावर प्रति किमी. दराने पुरविणे | २८,००,०००/- | १,४०,०००/- | २८,०००/- | १,०००/- | १ वर्ष |

सदर निविदेतील पुरवठ्याचा तपशील, अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटीशर्ती निविदा शेड्युल इत्यादीची माहिती मनपाच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. **सदरची निविदा मनपाच्या ई टेंडरींग पध्दतीने मनपाचे वेबसाईटवरून भरावयाची आहे.** याकामी मनपाच्या भांडार विभागात पुरवठा धारकांनी नोंदणी करणेसाठी नोंदणी फी र.रू ३०००/- चा डिमांड ड्राफ्ट व आवश्यक प्रमाणीत कागदपत्रे भांडार विभागात सादर करणे आवश्यक आहे. नोंदणी बाबतची सविस्तर माहिती भांडार विभागात मिळेल. सदरची निविदा भरणेसाठी नोंदणी अर्ज दि. ०७/०८/२०१० दुपारी ३:०० वाजे पर्यंत सादर करणेत यावेत. नोंदणी करताना आयकर भरत असल्याचा पुरावा, कमीतकमी ०४ वाहने स्वतःच्या मालकीची व सन २००९ किंवा त्यानंतरच्या मेकचे असल्या बाबत आर.सी.टी.सी. पुस्तके व इतर वाहनांचे करार नामे, पॅन कार्ड नंबर, वाहनाचा परमिट परवाना, वाहनाचा विमा उतरविल्या बाबतची कागदपत्रे, एअर पोलुशन सर्टिफिकेट्स मागील आर्थिक वर्षात र.रू ५० लाख उलाढाल झाली असले बाबत चार्टर्ड अकौन्टंट यांचेकडील दाखला भागीदारी व्यवसाय असल्यास त्याची कागदपत्रे इत्यादी सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती सादर करणे आवश्यक आहे.

सदरची ई-टेंडरींग प्रक्रीयेअंर्तगत निविदा दि. २८/०७/२०१० ते दि. १७/०८/२०१० दुपारी ३:०० वाजे पर्यंत ई-टेंडरींग पध्दतीने वेबसाईटवरूनच भरता येतील. जे निविदाधारक ई-टेंडरींग प्रक्रीये अंतर्गत नोंदणी करतील त्यांनाच Digital Key देण्यात येणार आहे, त्यांनाच निविदा भरता येईल. निविदा धारकांनी निविदेची फॉर्म फी, बयाणा रक्कम मनपाच्या खात्यात पेमेंट गेटवे सिस्टीम द्वारे (Electronic Banking sercice) भरावयाची आहे. सदर निविदेचे फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात येणार नाहीत, व फॉर्म स्विकृतीसाठी निविदा बॉक्स ठेवण्यात येणार नाही. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किवां अंशतः मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वतःकडे राखुन ठेवलेला आहे. सदरची निविदा www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा **www.pcmcgisda.org.in** या वेबसाईटवरून भरता येईल. सदर निविदा फक्त पेट्रोलवर चालणा-या मारुती व्हॅन प्रति किमी. पुरवठा करण्यासाठीच आहे. डिझेल किंवा LPG गॅसवर चालणा-या कोणत्याही वाहनासाठी दर मागवलेले नाहीत. याची नोंद घ्यावी अशी निविदा सादर केल्यास त्या निविदेचा दर कमी असला तरी ती स्वीकृत होणार नाही.

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

जाहिरात क्रमांक -१११
क्रमांक - जकात/१३/कावि/ २१८ /२०१०
दिनांक - २६/०७/२०१०

**सहाय्यक आयुक्त (जकात)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

d\salunkhe\Ghadge\13Tender Vehical\LP(28)

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११ ०१८
# आयातकर कार्यालय
# ई टेंडरींग निविदा नोटीस क्रमांक - १ / २०१०-२०११

**नियम व अटी-शर्ती**

**१)** सदर निविदेतील पुरवठ्याचा तपशील, अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटीशर्ती निविदा शेड्युल इत्यादीची माहिती मनपाच्या **www.pcmcindia.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा मनपाच्या ई टेंडरींग पध्दतीने मनपाचे वेबसाईटवरून भरावयाची आहे. याकामी मनपाच्या भांडार विभागात पुरवठा धारकांनी नोंदणी करणेसाठी नोंदणी फी र.रू ३०००/- चा डिमांड ड्राफ्ट व आवश्यक प्रमाणीत कागदपत्रे भांडार विभागात सादर करणे आवश्यक आहे. नोंदणी बाबतची सविस्तर माहिती भांडार विभागात मिळेल. सदरची निविदा भरणेसाठी नोंदणी अर्ज दि. ०७/०८/२०१० दुपारी ३:०० वाजे पर्यंत सादर करणेत यावेत. नोंदणी करताना आयकर भरत असल्याचा पुरावा, कमीतकमी ०४ वाहने स्वतःच्या मालकीची व सन २००९ किंवा त्यानंतरच्या मेकचे असल्याबाबत आर.सी.टी.सी. पुस्तके व इतर वाहनांचे करारनामे, पॅन कार्ड नंबर, वाहनाचा परमिट परवाना, वाहनाचा विमा उतरविल्या बाबतची कागदपत्रे, एअर पोलुशन सर्टिफिकेट्स मागील आर्थिक वर्षात र.रू ५० लाख उलाढाल झाली असलेबाबत चार्टड अकौन्टंट यांचेकडील दाखला भागीदारी व्यवसाय असल्यास त्याची कागदपत्रे इत्यादी सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती सादर करणे आवश्यक आहे.

सदरची ई-टेंडरींग प्रक्रीयेअंर्तगत निविदा दि. २८/०७/२०१० ते दि. १७/०८/२०१० दुपारी ३:०० वाजे पर्यंत ई-टेंडरींग पध्दतीने वेबसाईटवरूनच भरता येतील. जे निविदाधारक ई-टेंडरींग प्रक्रीये अंतर्गत नोंदणी करतील त्यांनाच Digital Key देण्यात येणार आहे, त्यांनाच निविदा भरता येईल. निविदा धारकांनी निविदेची फॉर्म फी, बयाणा रक्कम मनपाच्या खात्यात पेमेंट गेटवे सिस्टीम द्वारे (Electronic Banking sercice) भरावयाची आहे. सदर निविदेचे फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात येणार नाहीत, व फॉर्म स्विकृतीसाठी निविदा बॉक्स ठेवण्यात येणार नाही. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वतःकडे राखुन ठेवलेला आहे. सदरची निविदा **www.pcmcindia.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा **www.pcmcgisda.org.in** या वेबसाईटवरून भरता येईल. सदर निविदा फक्त पेट्रोलवर चालणा-या मारुती व्हॅन प्रति किमी. पुरवठा करण्यासाठीच आहे. डिझेल किंवा LPG गॅसवर चालणा-या कोणत्याही वाहनासाठी दर मागवलेले नाहीत. याची नोंद घ्यावी; अशी निविदा सादर केल्यास त्या निविदेचा दर कमी असला तरी ती स्वीकृत होणार नाही.

**२)** महापालिकेच्या जकात विभागाच्या फिरत्या पथकासाठी मारूती व्हॅन (५सिटर) या प्रकारची पेट्रोल वर चालणारी ०४ वाहने २४ तास वापरासाठी पुरविणे आवश्यक आहे.

**३)** भरारी पथकासाठी पुरविण्यात येणाऱ्या वाहनाची धाव दररोज २५० कि.मी. ३ शिफ्ट मिळून ग्राह्य धरण्यात आली असून २५० कि.मी. पेक्षा कमी अथवा जास्त धाव झाली तरी २५० कि. मी. चे भाडे अदा करण्यात येईल.

**४)** वाहनांची दुरूस्ती व देखभाल पुरवठाधारकाने स्वखर्चाने नियमित व तात्काळ विनाविलंब करावयाची आहे. दुरूस्तीसाठी वाहन थांबल्यास पर्यायी व्यवस्था पुरवठाधारक यांनी करावयाची आहे. त्यासाठी राखीव वाहन वाहनचालकासह तयार ठेवण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

**५)** पुरविणेत येणारी वाहने सुस्थितीत सन २००९ व त्यांनतरच्या मेकची असणे आवश्यक आहे. मोटार गाडीचा कर व विमा, आर.टी.ओ. परमीट खर्च तसेच इतर शासकीय परवाने व कर भरणेची व नुतनीकरणाची (आर.सी.टी.सी. बुक) याची संपूर्ण जबाबदारी पुरवठा धारकाची राहील. तसेच आर.टी.ओ. नियम व त्याची अमंलबजावणी पुरवठाधारकाची राहील.

**६)** भाड्याने पुरविण्यात येणा-या वाहनांवर काम करणारे वाहनचालक यांचे वेतन किमान वेतन कायद्याप्रमाणे लिहून देणाराने द्यावयाचे आहे. दिलेल्या वेतनाच्या झेरॉक्सच्या सत्य प्रती देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

**७)** आयातकर कार्यालयाचे आवश्यकतेनुसार व मागणीनुसार मागेल तेंव्हा जादा वाहनांचा पुरवठा करावा लागेल.

**८)** वाहनांचे रजिस्ट्रेशन, विमा, वाहनचालकाचा वाहन परवाना या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर वाहनचालक व वाहन यांच्या वैधतेबाबत सहाय्यक आयुक्त, जकात यांचा निर्णय अंतिम असेल व तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

९)  वाहन वापराचे योग्य त्या नमुन्यात लॉगबुक ठेवणे आवश्यक असून वाहन वापरना-या जकात निरीक्षक/ अधिका-याची त्यावर स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे. व वाहनचालकाने त्याची तपशिलवार नोंद ठेवली पाहिजे. जकात निरीक्षक यांची स्वाक्षरी नसलेस बिल दिले जाणार नाही.

१०) प्रत्येक वाहनाचे स्पिडोमीटर सुस्थितीत असणे आवश्यक आहे.

११)वाहनाचा अपघात झाल्यास त्याची व त्याअनुषंगाने वाहनांचे खर्चाची तसेच कर्मचारी /वाहनचालक यांना कोणतीही इजा झाल्यास येणाऱ्या सर्व प्रकारच्या नुकसान भरपाईची जबाबदारी वाहने पुरवठाधारकाची राहील.

१२)  भरारी पथकासाठी वाहन उपलब्ध करून न दिल्यास त्याबद्दल दंड त्या साठी प्रतिवाहन प्रतिपाळी र.रु. ७००/- दंड आकारण्यात येईल. पुरवठा धारकाने दररोज प्रत्येक पाळीसाठी वाहन उपस्थित करुन देणे आवश्यक आहे. जर वाहन शिफ्ट मध्ये उपलब्ध झाले नाहीत त्या दिवसाचे त्या शिफ्टचे भाडे व त्या शिफ्टचा दंड बिलातून कपात करणेत येईल.

१३)  हजर दिवसानुसार वाहनांचे बिल प्रति दिवस कि. मी. प्रमाणे निविदा मान्य दराने सहाय्यक आयुक्त, जकात, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे दरमहा ५ तारखेपर्यंत वाहनाचे लॉग बुकासह सादर केले पाहिजे. वाहन उपलब्ध न झालेल्या दिवसांचे भाडे देय राहणार नाही.

१४) सदर कामाची मुदत आदेशाचे दिनांकापासून एक वर्षापर्यंत राहील.

१५) सदरची निविदा स्विकृतीचे अंतिम दिनांकाचे दिवशी दुपारी ४:०० वाजता किंवा निविदा कमिटी ठरविल त्यादिवशी व वेळेस निविदा उघडण्यात येईल. निविदा उघडण्याच्या वेळी निविदाकार स्वताः अथवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहु शकेल.

१६) निविदा मंजुर ठेकेदाराने निविदे सोबत जोडलेली कागदपत्रे अवैध, अपुर्ण किंवा दिशाभुल करणारी असलेस तसेच करारनामा करणेस पाचारण केले असता करारनामा करणेस टाळाटाळ केलेस, किंवा करारनामा करणेस असमर्थता दर्शविलेस, तसेच वाहनाचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेस, सदर कामापोटी जमा केलेली बयाणा केलेली अनामत रक्कम जप्त करून पुरवठा आदेश रद्द करणेत येईल. अशा निविदा कारावर विधीवत दंडनिय व शिस्त भंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१७) निविदा फॉर्म मधील नमुद केलेल्या वाहन पुरवठ्याच्या संख्येत वाढ झाल्यास मंजुर दरानेच ज्यादा वाहनांचा पुरवठा करावा लागेल, त्याकरीता वाढीव दराची मागणी करता येणार नाही.

१८) ठेकेदारावर निविदेतील करारनाम्यातील व पुरवठा आदेशातील सर्व अटी शर्ती तसेच सक्षम अधिका-यांनी दिलेल्या सुचना बंधनकारक राहतील. यापैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास ठेकेदाराची जमा केलेली बयाणा/अनामत रक्कम जप्त करुन पुढील योग्यती कार्यवाही करणेत येईल.

१९) निविदा मंजूर पुरवठाधारकास एकूण रकमेच्या ५% प्रमाणे येणा-या रकमेतुन भरलेली बयाणा रक्कम वजा जाता उर्वरित अनामत रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकेची एफ.डी.आर. सादर करावी लागेल.

२०) निविदा मंजूर पुरवठाधारकास अनामत रकमेच्या ३% अधिक रूपये १००/- प्रमाणे येणा-या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने करारनामा करून द्यावा लागेल. काम समाधानकारक पूर्ण केलेनंतर मुदत संपलेनंतर बयाणा/अनामत रक्कम परत केली जाईल. काम असमाधानकारक केल्यास बयाणा/अनामत रक्कम जप्त करणेचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

२१) निविदा मंजूर पुरवठाधारकास कामाचा करारनामा करण्यापुर्वी असा ठेकेदार / ठेकेदारी संस्था महापालिकेचे विद्यमान नगरसेवक, स्विकृत सदस्य यांचेशी संबंधित नाही याबाबत रक्कम रूपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराईज करून द्यावे लागेल.

२२)  निविदा दर निविदा उघडल्यापासून १२० दिवस ग्राह्य राहतील.

२३)सदरचा ठेका अन्य कोणत्याही ठेकदारास पोटठेक्याने देता येणार नाही. निविदाकाराने स्वतःच्या अटी देऊ नयेत. अटीयुक्त निविदांचा विचार केला जाणार नाही.

२४)ठेकेदार व मनपा यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद उद्‌भवल्यास लवादाच्या कायद्याच्या अनुसंगाने सोडविला जाईल व याकामी मा. आयुक्त, पिं.चिं.मनपा यांचा एकपर्यायी लवादा राहील व लवादाचा निर्णय हा उभयपक्षावर बंधनकारक राहील.

२५)कोणतीही निविदा पुर्णतः अथवा अंशतः कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

२६)वाहन चालक यांचेकडील ड्रायव्हिंग लायसन्स किमान ३ वर्षापुर्विचे असणे आवश्यक आहे.

२७) वाहनावरील वाहनचालक यांनी डयुटी सुरु करणे पुर्वी मुख्य कार्यालयातील ठेकेदरामार्फत ठेवण्यात आलेल्या हजेरी रजिस्टरवर स्वाक्षरी करुन कामास सुरुवात करणे आवश्यक आहे.

२८) वाहनचालक यांच्या संपुर्ण नावाची यादी पत्त्यासह कार्यालयात परवाना सत्यप्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.

२९) प्रत्येक वाहनावर प्रत्येक पाळीकरता दिवसाला तीन स्वतंत्र वाहनचालक असणे आवश्यक आहे. वाहन चालकाने जकात विभागाकडील शिफ्टच्या वेळेपुर्वी १५ मीनीटे आगोदर मुख्य कार्यालयात हजर राहणे आवश्यक आहे. कोणत्याही परीस्थितीत ८ तासापेक्षा जास्त तासाचे कामकाज वाहनचालकास देण्यात येऊ नये. तसे निदर्शनास आल्यास देण्यात आलेले काम त्वरीत रदद करणेचा अधिकार मा. सहा. आयुक्त यांना राखून ठेवण्यात आलेला आहे.

३०) मारुती व्हॅनप्रकारच्या वाहनाचे परवाने सार्वजनीक वापरातील वाहनासाठीचे असल्यासच वाहने भाडे तत्वावर घेण्यात येतील खाजगी वापराच्या अन्य वाहनांचा निविदा प्रक्रीयेत विचार केला जाणार नाही.

३१)जकात विभागाचे फिरतेपथकासाठी पुरविणेत येणारी वाहने ही पेट्रोलवरच चालणारी वाहने असणे बंधनकारक आहे. गॅसवर चालणारी वाहनांचा वापर करता येणार नाही.

३२) ठेकेदाराने पुरविलेल्या वाहन चालकास त्या ठेकेदारांचे मार्फत देण्यात आलेले ओळखपत्र लावणे आवश्यक आहे.

३३) पुरविण्यात येणारी वाहने ही प्रत्येक पाळी सुरु होणेपुर्वी वाहन वाहनचालकासह मुख्य कार्यालयात हजर असणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत सदरच्या वाहनांचा खाजगी वापर केल्याचे निदर्शनास आल्यास त्या वाहनाचे त्या पाळीमध्ये होणारे भाडे अदा केले जाणार नाही.

३४) वाहन चालकास तीन वर्षाचा वाहन चालवण्याचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

३५) फक्त पेट्रोलवरील चालणा-या वाहनांचा कि.मी. चा दर देणे आवश्यक आहे.

३६) पुरविणेत येणाऱ्या वाहनामध्ये मोबाईल चार्जिंगची सोय उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

३७) मोटार ट्रान्सपोर्ट व्हिईकल ॲक्टनुसार नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

३८) लेबर कॉन्ट्रक्ट लायन्स असणे आवश्यक आहे.

३९) ठेकेदार पध्दतीने घेतलेली वाहने स्टॅंडबाय ठेवु नयेत. ती फिरतीवर असावीत, असे आढळल्यास करारनामा रद्द करून अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

**निविदाधारकाचे नाव व सही**

**पत्ता :-**

**शिक्का**

**सही/-**

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

**सहाय्यक आयुक्त, जकात**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

d\salunkhe\Ghadge\13Tender Vehical\LP(29-31)

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
# आयातकर कार्यालय

## निविदा नोटीस क्रमांक - १ / २०१०-२०११

**भरारी पथकाच्या वापरासाठी फक्त पेट्रोलवर चालणारी मारूती व्हॅन प्रतिकिमी. दराने पुरवठा करणेसाठी दरपत्रक**

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | फक्त दर प्रती कि.मी. नमुद करावा |
|---|---|---|
| १ | पेट्रोलवर चालणारी मारूती व्हॅन २४ तास ३ पाळयात वापरासाठी | |

१) निविदा धारकाचे संपुर्ण नाव :-

२) पत्ता :-

३) फोन नंबर :-

कार्यालय फोन नंबर :-

मोबाईल नंबर :-

४) निविदा धारकाची सही व शिक्का :-

---

d\salunkhe\Ghadge\13Tender Vehical\(32)